# सलील चौधरी - भाग ३



यानंतरच्या काळात सलिलदा यांनी शीघ्रकवितेच्या स्वरूपात, नवनव्या प्रकारची गीते लिहिण्यास सुरवात केली, त्यामुळे ते नक्की कुठल्या विषयावर लिहितील हे कळणे कठीण होते. त्यांनी स्वत:चे विचार व भावना या काळात व नंतरही त्यांच्या गीतांत उतरवले. उदा. 'जागते रहो', 'एक गांव की कहानी', 'मधुमती', 'उसने कहा था', 'परख', 'हाफ टिकट' आणि इतरही अनेक सिनेमांमध्ये. त्यांनी रागदारीवर आधारित अनेक सुमधुर गाणी केली. उदाहरणार्थ, 'आजा रे परदेसी' आणि 'घडी घडी मेरा दिल धडके' (दोन्ही 'मधुमती'तील व राग बागेश्री वर आधारित), 'जागो मोहन प्यारे' ('जागते रहो'

मधील राग भैरववर आधारित), ’जा रे जा रे उड जा रे पंछी’ (’माया’ मधील, राग भैरवीवर आधारित), ’टूटे हुवे ख्वाबोंने’ (’मधुमती’ मधील, राग दरबारी कानडावर आधारित), ’तसवीर तेरी दिल मे’ (’माया’ मधील, राग भैरवीवर आधारित), ’ओ सजना’ (’परख’ मधील, राग खमजवर आधारित), ’छम छम नाचत आयी बहार’ (’छाया’ मधील, राग बहारवर आधारित), ’ना जिया लागे ना’ (’आनंद’ मधील राग मालगुंजीवर आधारित) इत्यादी. त्यांनी पाश्चात्य वाद्य व पध्दतीही उत्तम रित्या वापरल्या. लताने ’परख’ मध्ये गायलेल्या ’मिला है किसी का झुमका’ या गाण्यात त्यांनी मँडोलीन व ओबो वापरले. ’साथी रे’ (’पूनम की रात’/लता) मधलं philharmonic progression! ’उसने कहा था’ मधील तलत व लता ने गायलेले उडत्या चालीचे ’अहा रिमझिम के ये प्यारे प्यारे गीत लिये’ हे हिंदुस्तानी आणि पाश्चात्य मिश्रणाचे आणखी एक उदाहरण आहे. लताने ’परख’ मधे गायलेल्या ’ओ सजना’ गाण्यात त्यांनी जयराम आचार्यांच्या प्रभावी सतारीचा वापर केला, तसेच लताने ’मधुमती’त गायलेल्या ’आजा रे परदेसी’ मधे मनोहारी सिंगाच्या आनंदमयी बासरीचा वापर केला. अजून उदाहरणे द्यायची झाली तर, रफी व कोरस ने ’काबुलीवाला’ मधे गायलेल्या ’ओ सुबहा, कहना मेरे दिलदार को’ या गाण्यात मँडोलिनचा उपयोग, रफीने ’माया’मधे गायलेल्या ’कोई सोने के दिलवाला’ गाण्यामधे अत्युत्कृष्ट पियानोचा उपयोग आणि मुबारकने ’मधुमती’त गायलेल्या ’हम हाल-ए-दिल सुनायेंगे’ या गाण्यात स्वर्गीय हार्मोनियमचा उपयोग. सलिल चौधरी यांनी दिलेले संगीत मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे.

हा दिग्गज संगीतकार परिपूर्णतेसाठी कायम अस्वस्थ असे. आणि ते गीतांमधील स्थायी, अंतरा, संचारी या नेहमीच्या प्रकाराच्या बहुधा विरोधात असत. ते आरोह - अवरोहच्या रुढ पध्दतीने गीते न रचता स्वत:च्या पसंतीने करीत. ते वरच्या सुरात सुरुवात करीत आणि आरोहात वर जाण्याऐवजी स्थायीच्या दरम्यान किंवा नंतर ते अवरोहाप्रमाणे सूर खाली आणत. ’आनंद’ मधील ’जिंदगी कैसी है पहेली हाये’ किंवा ’एक गाँवकी कहानी’ मधील ’झुम रे’ ही उदाहरणादाखल सांगता येतील. केव्हा केव्हा गीतांतून ते संभाषणाचाही वापर करीत. ’प्रेमपत्र’ या चित्रपटात, लता बरोबरच्या ’सावन की रातो में’ या गाण्यात तलतने लताबरोबर सुरेख संवाद साधला आहे किंवा मीनाकुमारीने ’पिंजरेके पंछी’ या चित्रपटात ’कुब्रा चढे घोडी’ या गाण्यात मन्ना डे गाणं म्हणत असताना मधूनच संवाद आणि हास्य यांची किती सुरेख पेरणी केली आहे. प्रत्येक वेळी ते वेगळे काही तरी वैशिष्ट्यपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

१९७० पर्यंतच्या त्यांच्या गाण्यांची संक्षिप्त यादी पुढील प्रमाणे आहे.

| Song | Singer | Film |
|---|---|---|
| Dharti kahe pukaar ke | Lata, Manna Dey, chorus | Do Bigha Zameen |
| Aararam tararam, duniya ke kaise | Kishore | Aawaaz |
| Ja tose naahi boloon | Lata & Manna Dey | Parivaar |
| Kooen mein kood ke mar jaana | Kishore, chorus | Parivaar |
| Zindagi khwab hai | Mukesh | Jagte Raho |
| Jaago Mohan pyaare | Lata, chorus | Jagte Raho |
| Phir wohi dard hai, phir wohi jigar | Manna Dey | Apradhi Kaun |
| Raat ne kya kya khwab | Talat | Ek Gaon Ki Kahani |
| Jhoome re, neela ambar | Talat | Ek Gaon Ki Kahani |
| Munna bada pyaara | Kishore | Musafir |
| Suhana safar aur yeh mausam haseen | Mukesh, chorus | Madhumati |
| Aaja re pardesi | Lata | Madhumati |
| Ghadi ghadi mora dil dhadke | Lata | Madhumati |
| Dil tadap tadap ke keh raha hai | Mukesh & Lata | Madhumati |
| Toote hue khwabon ne | Rafi | Madhumati |
| Hum haal-e-dil sunaenge | Mubarak Begum | Madhumati |
| Mila hai kisi ka jhumka | Lata | Parakh |
| O sajna, barkha bahaar aayee | Lata | Parakh |
| Machalti aarzoo, khadi | Lata | Usne Kaha Tha |
| Aaha rimjhim ke yeh pyaare | Lata & Talat | Usne Kaha Tha |
| Itna na mujhse tu pyaar | Talat & Lata | Chhaya |
| Chham chham naachat aayee bahaar | Lata | Chhaya |
| Aansoo samajh ke kyoon | Talat | Chhaya |
| Aye mere pyaare watan | Manna Dey | Kabuliwala |

| Song | Singer | Film |
| --- | --- | --- |
| Ganga aaye kahaan se | Hemant | Kabuliwala |
| Koi sone ke dilwala | Rafi | Maya |
| Tasweer teri dil mein | Lata & Rafi | Maya |
| Ja re, ja re ud ja re panchhi | Lata | Maya |
| Aye dil kahaan teri manzil | Dwijen Mukherjee or Lata, chorus | Maya |
| Aake seedhi lagi dilpe jaise katariya | Kishore or Lata | Half Ticket |
| Ek samay par do barsaaten | Manna Dey | Jhoola |
| Saawan ki raaton mein ayesa | Lata & Talat | Prem Patra |
| Baag mein kali khili bagiya | Asha | Chand Aur Suraj |
| Saathi re, tujh bin jiya | Lata | Poonam Ki Raat |
| Zindagi, kaisi hai paheli haye | Manna Dey | Anand |
| Na, jeeya laage na | Lata | Anand |
| Maine teri liye hi saat rang | Mukesh | Anand |
| Kaheen door jab din dhal jaye | Mukesh | Anand |

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”,

which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com